REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख १७ डिसेंबर १९४७ अंक ४९

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

**दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २**

—आमचीं वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड**

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

**ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड**

पो. ओगलेवाडी ( सं. औंध ), जि. सातारा
कांचमाल, एनामल वेअर व प्रभाकर कंदीलाचे कारखानदार

**नवीन भांडवल वाढ**

कारखान्याच्या वाढीच्या योजना पूर्ण करण्यासाठीं कंपनीने आपले पूर्वीचे दहा लक्षाचे अधिकृत भांडवलांत आणखी पंधरा लक्षांची वाढ करून एकूण अधिकृत भांडवल पंचवीस लक्ष रुपयांचें केलें आहे. मागील खेपेस विक्रीसाठीं काढलेलें २ लक्ष रुपयांचें भांडवल लगेच संपून गेल्यामुळें अनेक हितचिंतक, मित्र व सन्मान्य गृहस्थ यांना त्यांतील भाग मिळाले नाहींत, त्यामुळे त्यांचा रोष त्यावेळीं आम्हांस सहन करावा लागला. म्हणून यावेळीं दहा लक्ष रुपयांचें दोन लक्ष सामान्य भागांत विभागलेलें भांडवल विक्रीस काढलें आहे. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत पांच रुपये असून, विक्रीची किंमत ( दर्शनी किं. रु. ५ अधिक वाढ रु. २ अशी ) ७ रुपये आहे.

रकमेचा भरणा—अर्जासोबत प्रत्येक भागाबाबत रु. ४ ( भागाबाबत रु. २ अधिक वाढ रु. २ ) व बाकीचे दर भागास रु. ३ प्रमाणें कंपनीकडून मागणी आलेवर भरणा करणेचे.

तरी ज्यांना शेअर्स घेणेचे असतील त्यांनीं कंपनीकडून शेअर अर्जाचे फॉर्म्स मागवून घ्यावेत.

एस. पी. ओगले आणि कं.
मॅनेजिंग एजंटस.

**विजय टेक्सटाइल्स लि.**

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.

# विविध माहिती

**चोरट्या व्यापाराविरुद्ध कडक इलाज**—एखाद्या वहानांतून बेकायदा रीतीनें वस्तूंची आवक-जावक होत असल्याचें आढळून आल्यास तें वहान व त्यांतील माल दोन्हीही जप्त करण्याचा हुकूम कोर्टानें दिलाच पाहिजे असा निर्बंध संयुक्तप्रांत सरकार घालणार आहे. ह्याशिवाय चोरट्या व्यापाराविरुद्ध कायदे अधिक कडक करण्याचेंही त्या सरकारनें ठरविलें आहे.

**पाकिस्तानांत कोळसा सांपडला**—पेशावरपासून पूर्वेला ३० मैलांवर टिव्हा नांवाच्या डोंगरांत कोळशाचा मोठा सांठा आढळून आला आहे. ह्या डोंगरांतील कोळशाचा १ फुटाचा थर ओलसर आहे परंतु, त्याच्याखालीं कठीण व कोरडा कोळसा असून तो जळण म्हणून वापरतां येण्यासारखा आहे असें समजतें.

**रशिआचे कारखाने युद्धाला सज्ज**—मॉस्कोमधील अमेरिकेच्या वकिलातीमधील एका माजी तज्ज्ञानें अशी माहिती सांगितली कीं रशिआंतील कारखाने युद्धाच्या तयारीनें सज्ज ठेवण्यांत आले आहेत. त्याच्या मतें, रशियाचें औद्योगिक सामर्थ्य अमेरिकेच्या तोडीचें होण्यास आणखी २०-वर्षें लागतील. कम्युनिझम आणि भांडवलशाही ह्यांच्यांत संघर्ष होणें अपरिहार्य असल्यामुळें युद्धाची तयारी असण्याच्या हेतूनेंच रशिआचा आर्थिक कार्यक्रम आखला गेला आहे, असें मत ह्या तज्ज्ञानें व्यक्त केलें आहे.

**म्हैसूरमधील पाटबंधारे व धरणें**—म्हैसूर सरकारनें ८१ लाख रुपये खर्चून एक धरण बांधण्याच्या योजनेला मंजुरी दिली आहे. ह्या धरणामुळें २० हजार एकर जमीन पाण्याखालीं येईल. धरणाच्या पाण्याचें क्षेत्रफळ सहा मैलांवर पसरेल. धरणाच्या आसपासच्या भागांत हिंवताप फैलावूं नये म्हणून दक्षता घेण्यांत येणार आहे.

**अमेरिकेंतील तेलाच्या कंपन्या**—अमेरिकेंत तेलाचा व पेट्रोलचा धंदा करणाऱ्या ३४,००० कंपन्या आहेत. त्यांपैकीं १३,५०० तेल उत्पादन करणाऱ्या असून, २०,००० घाऊक व्यवहार करणाऱ्या व तेल वाटणाऱ्या आहेत. तेल शुद्ध करणाऱ्या कंपन्यांचे ४०० कारखाने असून सुमारें ६५० कंपन्या तेलापासून निरनिराळ्या वस्तू तयार करणाऱ्या व तेलाची वहातूक करणाऱ्या आहेत.

**अमेरिकेंत शिधा-पद्धतीचा संभव**—प्रे. ट्रूमन ह्यांच्या सरकारच्या अन्न समितीनें असा इषारा दिला आहे कीं, अन्नाची बचत व जपणूक काळजीपूर्वक केली गेली नाहीं, तर अमेरिकेंत पुढील ऋतूंत शिधापद्धति अंमलात आणावी लागेल. बाहेरच्या देशांतील अन्नधान्याची कठीण परिस्थिति आणि अमेरिकेंतील चलनवृद्धि ह्यांचा धोका टाळण्यासाठीं समितीनें अन्नपदार्थांची बचत करण्याची मोहीम सुरू केली आहे.

**कापडाच्या किंमतीवर जादा आकार**—हिंदुस्थान सरकारनें एक वटहुकूम काढून कांहीं प्रकारच्या कापडाच्या किंमतीवर जादा आकार वसूल करण्याचें ठरविलें आहे. हा वट हुकूम ता. १ डिसेंबर १९४७ पासून अमलात आला. कापडाच्या किंमतींत स्थिरता आणण्यासाठीं कॉटन टेक्स्टाइल्स ईन्कलायझेशन फंड उभारता यावा म्हणून हा जादा आकार वसूल करण्यांत येणार आहे. ह्या फंडांतून उत्पादकांना मदत देणें, फंडाच्या १२½ टक्केपेक्षा अधिक नाहीं इतकी रकम प्रांतिक सरकारांना ग्रँट म्हणून देणें, इत्यादि गोष्टी सरकारला करता येतील. फंडाची आकारणी चुकविणारांना सहा महिने सक्त मजुरी अगर २,००० रु. दंड अगर दोन्ही शिक्षा ठेवण्यांत आल्या आहेत.

**डफरिन पुलाचा 'मालवीय पूल' झाला**—संयुक्त प्रांताचे पंतप्रधान पं. गोविंद वल्लभ पंत ह्यांनीं ६० वर्षांच्या जुन्या डफरिन पुलाचें नवें नांव 'मालवीय पूल' असें ठेवलें. हा पूल बनारस येथें असून गंगेवरील सर्वांत तो मोठा पूल आहे. पूर्वी ह्या पुलावरून फक्त एकच रुंद रुळांची रेल्वे आणि २२ फूट रुंदीचा गाडी रस्ता, असे दोन रस्ते एकास समांतर जात होते. १९३९ सालीं सरकारनें पुलाची पुनर्घटना करण्याचें ठरविलें. ती आता पुरी झाली असून रुंद रुळाचे दोन लोहमार्ग, २५ फुटांचा गाडी रस्ता आणि ४ फुटांचे दोन पायमार्ग इतक्या रस्त्यांची सोय करण्यांत आली आहे. पुलाच्या पुनर्घटनेला ८२ लाख रुपये खर्च आला. त्यांतील २८ लाख रुपये संयुक्त प्रांत सरकारनें दिले.

**फेडरल कोर्टाच्या कार्यक्षेत्राची वाढ**—हिंदी घटना समितीच्या विधिमंडळाच्या अधिवेशनांत मध्यवर्ती फेडरल कोर्टाच्या अधिकारक्षेत्रांत वाढ करणारें डॉ. आंबेडकर ह्यांचें बिल मंजूर झालें. हायकोर्टांनीं दिलेल्या दिवाणी निवाड्यांविरुद्ध अपील करण्यांत आलें तर त्यांची सुनावणी प्रथमतः फेडरल कोर्टापुढें करण्यांत यावी असा ह्या बिलाचा उद्देश आहे. १९३५ च्या घटना कायद्याप्रमाणें असा कायदा करतां आला नसता; पण सध्याची घटना समिति सार्वभौम असल्यानें तिला असा कायदा करता आला. ह्या कायद्यामुळें प्रिव्ही-कौन्सिलपुढें जाणारीं अपिलें जवळ जवळ नाहींशीं होतील.

**खराब नोटा बदलण्याची सोय**—खराब झालेल्या नोटा बदलून देण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें दिल्ली येथें रिझर्व्ह बँकेच्या इश्यु खात्याची एक कचेरी १ डिसेंबर १९४७ पासून उघडली आहे. ह्या कचेरीतर्फे हिंदुस्थान सरकारच्या आणि रिझर्व्ह बँकेच्या खराब झालेल्या नोटा बदलून देण्यांत येतील.

**शिधा वाटप खात्यांतील स्त्रियांच्या नोकऱ्या**—मुंबई येथील शिधा वाटप नोकर संघाची सभा कु. कृष्णाबाई मोरे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतीच भरली होती. अन्नधान्यावरील नियंत्रणें रद्द करण्याच्या सरकारच्या धोरणामुळें, बऱ्याच स्त्रिया बेकार होण्याचा संभव निर्माण झाला आहे. पुरवठा खात्यांतील १,२०० स्त्री नोकरांपैकीं सुमारें ७५० रेशनिंग खात्यांत नोकरीला आहेत. ह्यांपैकी कित्येकांच्या मिळकतीवर त्यांच्या कुटुंबियांचें पोषण अवलंबून आहे.

**स्वतंत्र हिंदुस्थानसाठी पोस्टाचीं तिकिटें**—हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानच्या स्वतंत्र दर्जाला शोभण्यासारखीं पोस्टाचीं तिकिटें १९४८ सालीं काढण्याचें ठरविलें आहे. तिकिटांच्या नमुन्यासाठी कलावंतांची स्पर्धा लावण्यांत येणार असून ७,५०० रुपयांचीं बक्षिसें देण्यांत येणार आहेत. तिकिटावरील राजाचा मुखवटा रद्द करण्यांत येणार आहे.

**रामपदसागर येथील धरण**—मद्रास प्रांतांतील सर्वांत मोठ्या रामपदसागर येथील धरणाला ६½ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज १९४५ सालीं करण्यांत आला होता. परंतु धरणासाठी लागणाऱ्या साहित्याचे व मजुरीचे वाढलेले दर लक्षांत घेता ह्या धरणाला आतां १२७ कोटी रुपये खर्च येईल, असा दुरुस्त अंदाज करण्यांत आला आहे. मद्रास सरकारनें मध्यवर्ती सरकारशीं मदतीसंबंधीं बोलणीं चालू केलीं आहेत.

**ब्रिटनमध्यें पोस्टाचीं नवीं तिकिटें**—ब्रिटनच्या राजा-राणीच्या विवाहास २५ वर्षे पुरीं होतात, त्यानिमित्त एप्रिल ता. २६ ला ब्रिटनमध्यें पोस्टाचीं नवीं तिकिटें स्मरणार्थ म्हणून काढण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें, जुलै १९४८ मध्यें ब्रिटनमध्यें भरणाऱ्या ऑलिंपिक सामन्यांच्या स्मरणार्थहि नवीन तिकिटें काढण्याचें ठरलें आहे.

# ❦ अर्थ ❦

बुधवार, ता. १७ डिसेंबर १९४७





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. स. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## राष्ट्रीय चलनास परदेशाच्या रोख्यांचा आधार

### अर्थमंत्री श्री. चेट्टी ह्यांचें कायदेशीर परतु परिस्थितीशी विसंगत उत्तर

हिंदी चलनास आधार कोणता व तो किती प्रमाणांत असावा, हें रिझर्व्ह बँक कायद्यानें ठरवून दिलेलं आहे. रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याचें जेवढें देणें असेल, तितकी तरी त्याची जिंदगी कायम असलीच पाहिजे. ह्या जिंदगीच्या किमान ४०% इतका भाग सोन्याचीं नाणीं, सोनें किंवा स्टर्लिंग रोखे ह्यांत असावयास पाहिजे, परंतु त्यांतील सोन्याचीं नाणीं व सोनें ह्यांची किंमत ४० कोटी रुपयांचे खाली कधींहि जातां कामा नये. उरलेल्या कमाल ६०% भागांत रुपये, हिंदी सरकारचे रोखे, इत्यादींचा समावेश होतो. हिंदी सरकारच्या रोख्यांची किंमत ५० कोटी रुपयांच्यापेक्षा किंवा एकूण जिंदगीच्या एक चतुर्थांशापेक्षां अधिक भरता कामा नये. हिंदुस्थान हा ब्रिटिशतंत्र होता, तेव्हां ही व्यवस्था ठीक होती; परंतु आतां परिस्थिति पालटली आहे. "दुसऱ्या देशाच्या चलनाचा आधार घेणें जिला बंधनकारक आहे, असें स्वतंत्र देशाचें दुसरें एकादें तरी चलन आहे काय ?" असा प्रश्न हिंदी यूनियन पार्लमेंटांत अर्थ-मंत्र्यांस नुकताच विचारण्यांत आला, त्यास देण्यांत आलेलें उत्तर समर्पक दिसत नाहीं. "चलनाच्या परदेशी आधाराच्या सक्तीचा प्रश्न येतो कोठें? रिझर्व्ह बँकेच्या चलनास आधार म्हणून ज्या अनेक बाबी कायद्यास सम्मत आहेत, त्यांत ब्रिटिश पौंड ही फक्त एक बाब आहे" असें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें. हिंदी चल-नाच्या आधारांपैकीं किमान दोन पंचमांश आधार सोन्याचा व ब्रिटिश रोख्यांचा असावयास पाहिजे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या पत्रकाप्रमाणें, तिनें एकूण १२७४¾ कोटी रुपयांच्या नोटा काढ-लेल्या आहेत व त्यांस तारण खालीलप्रमाणें आहे:—४४¾ कोटी रुपयांचें सोनें, ११३५¼ रुपयांचे ब्रिटिश पौंडी रोखे, ३७ कोटी रुपयांचीं नाणीं आणि ५७¾ कोटी रुपयांचे हिंदी सरकारचे रोखे. एकूण १२७४¾ कोटी रुपयांच्या दोन पंचमांश इतकी रक्कम ५१० कोटी रुपये होते. एवढी रक्कम ब्रिटिश पौंडी रोख्यांत किंवा सोन्यांत राखणें रिझर्व्ह बँकेवर बंधनकारक आहे. आज ह्या ५१० कोटी रुपयांपैकी फक्त ४४¾ कोटी रुपयांचेंच सोनें रिझर्व्ह बँकेनें बाळगलेलें आहे. हिंदी चलनास तारण म्हणून हिंदी सरकारचे रोखे ठेवले, तर त्यांची कमाल रक्कम ३१८ कोटी रुपयांपेक्षां अधिक कायद्याप्रमाणें असूंच शकणार नाहीं.

खालील तक्त्यावरून, हिंदी चलनी नोटांस किमान १२७४¾ कोटी रुपयांचें तारण हवें, परंतु त्या तारणांत स्टर्लिंग रोखे असण्याचें मुळींच बंधन नाहीं हें दिसून येईल. परंतु, सोनें व स्टर्लिंग रोखे मिळून जिंदगीच्या ४०% असणें जरूर असल्या-कारणानें व सोनें फक्त ४४¾ कोटींचेंच असल्यामुळें आजच्या रिझर्व्ह बँक कायद्याप्रमाणें बँकेनें ५१०—४४¾=४६५¼ कोटी रूपयांचें आणखी सोनें तरी तारण ठेवलें पाहिजे किंवा तेवढे स्टर्लिंग रोखे तरी बाळगले पाहिजेत हें उघड आहे. एकूण जिंदगीच्या २५% पेक्षा अधिक रकमेचे हिंदी रोखे असूंच शकत नसल्याकारणानें, रिझर्व्ह बँक फक्त ३१८ कोटी रुपयांच्या हिंदी रोख्यांचाच तारण म्हणून उपयोग करूं शकेल. परंतु तेवढे रोखे बँकेजवळ नाहींत. सोनें-स्टर्लिंग रोख्यांच्या (अ) गटांत स्टर्लिंग रोख्यांचाच कायद्यानें आवश्यक नसतांना भरणा आहे आणि (ब) गटांत ३१८ कोटी रुपयांच्या हिंदी रोख्यांस वाव असतांना फक्त ५७¾ कोटी रुपयांचेच हिंदी रोखे बँक ठेवूं शकली आहे. स्टर्लिंग रोख्यांचें प्राबल्य ह्यावरून सिद्ध होत नाहीं काय ?

हिंदी चलनास ब्रिटिश पौंडी रोख्यांचा आधार सम्मत आहे एवढ्याच मुळें केवळ फाजील चलनविस्तारास प्रोत्साहन मिळण्याचें

#### १२७४¾ कोटी रुपयांच्या हिंदी चलनी नोटांचें तारण.

| | ता. ५-१२-४७ रोजींची जिंदगी | कायद्यानें आवश्यक जिंदगी |
|---|---|---|
| (अ) सोनें ... | ४४¾ कोटी रु. | ४० कोटी रु. **किमान** |
| स्टर्लिंग रोखे ... | ११३५¼ कोटी रु. | ० |
| सोनें व स्टर्लिंग रोखे मिळून... | ११७९¾ कोटी रु. | ५१० कोटी रु. **किमान** ( एकूण जिंदगीच्या किमान ४०% ) |
| (ब) रुपये ... | ३७ कोटी रु. | ० रु. |
| हिंदी रोखे ... | ५७¾ कोटी रु. | ३१८ कोटी रु. **कमाल** ( एकूण जिंदगीच्या कमाल २५% किंवा कमाल ६० कोटी रु. पैकीं ज्यास्त रक्कम ) |
| बिल्स ऑफ एक्सचेंज व प्रॉमिसरी नोट्स ... | • | ० |
| | | ४० कोटी रु. **किमान किंमतीचें** सोनें, ५१० कोटी रु. **किमान किंमतीचें** सोनें व स्टर्लिंग रोखे मिळून; ३१८ कोटी रु. **कमाल** किंमतीचे हिंदी रोखे. बाकीच्या रकमेंत सोनें, स्टर्लिंग रोखे, रुपये, बिल्स, प्रॉ. नोटा, इ. |
| एकूण जिंदगी ... | १२७४¾ कोटी रु. | १२७४¾ कोटी रु. ची जिंदगी. |

कारण नाहीं, असें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें. परंतु, ब्रिटिश पौंड देणारास त्यांच्या बदली रुपये पुरविण्याचें बंधन रिझर्व्ह बँकेवर आहे. गेल्या युद्धाचे वेळीं, ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर मालखरेदी येथें केली, त्याची रकम ब्रिटिश पौंडांत लंडनमध्यें दिली व तिचे बदली रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थानांत चलन पुरवलें. ह्या रुपयांच्या सहाय्यानेंच ब्रिटिश सरकारची येथें मालखरेदी झाली. लंडनमध्यें साठलेल्या पौंडी गंगाजळीचे आधारावर हिंदुस्थानांत भरमसाट चलनविस्तार झाला आणि त्याचा दुष्परिणाम आपणांस भोगावा लागला व लागत आहे. हिंदी चलनास ब्रिटिश पौंडी रोख्यांचा आधार असलाच पाहिजे असें बंधन जरी कायद्यांत नसलें, तरी परिस्थिति मात्र तशीच आहे आणि ११३५½ कोटी रुपयांचा आजचा पौंडी आधार काढून त्यांची जागा दुसऱ्या कोणत्या तरी आधारानें भरून काढावयाची म्हटलें तर तें आज अशक्य आहे. बरें, ह्या ब्रिटिश पौंडी रोख्यांचा ग्रेट ब्रिटनमध्यें यंत्रसामुग्री वगैरे खरेदीसाठीहि उपयोग होण्याजोगी अनुकूलता नाहीं. रोख्यांचें हें येणें गोठून गेलें असून, हिंदी चलनाचा हा पाया खरोखरच निर्जीव झाला आहे. अशा परिस्थितींत ब्रिटिश पौंडी रोख्यांचा आधार घेणें हिंदी चलनास आवश्यकच आहे, असें नाहीं, हें म्हणणें कायद्यास धरून असलें तरी प्राप्त परिस्थितीशीं तें विसंगत आहे.

ब्रिटिश पौंडी रोख्यांचा आधार कायद्यानें जरूर नाहीं, अशा रोख्यांत रिझर्व्ह बँकेचे आज प्रत्यक्ष ११३५½ कोटी रुपये गुंतलेले आहेत, हें वर सांगितलेंच आहे. म्हणजे, बँकेच्या इश्यू खात्याच्या एकूण जिंदगीपैकीं ८८½% रकम पौंडी रोख्यांतच आहे. हे आकडे व रोख्यांचें गोठलेलें स्वरूप हीं लक्षांत घेतलीं, म्हणजे अर्थमंत्र्यांनीं प्राप्त परिस्थितीचा स्पष्टपणें खुलासा केला असता तर कांहीं बिघडलें नसतें, असें म्हटल्याविना रहावत नाहीं.

---

**नवसमाज लि., नागपूर**—"इंडिपेंडंट" ह्या इंग्रजी साप्ताहिकाचे श्री शेवडे बंधू व "भवितव्या"चे श्री. पु. य. देशपांडे ह्यांनीं वरील कंपनी नोंदविली आहे. तिचें अधिकृत भांडवल १० लक्ष रु. असून ५ लक्षांचें भांडवल विक्रीस काढलें जाईल.

**फाळणीबाबत विकट प्रश्नांचा निकाल**—हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचेमधील फाळणी पूर्वीच्या हिंदी राष्ट्राची जिंदगी व देणें हीं वाटून घेण्याबाबत बोलणीं दोन्हीं देशांच्या प्रतिनिधींचे मध्यें चालू होती, तीं यशस्वी होऊन पंचांकडे कोणताहि प्रश्न पाठविण्याचें आतां कारण पडणार नाहीं. फाळणीपूर्व ४०० कोटींच्या रोख शिल्केपैकी ७५ कोटी रु. रोख शिल्लक पाकिस्तानला मिळेल. कर्जापैकीं १७½% कर्ज पाकिस्तानचे वाट्यास जाईल. हिंदुस्थान सरकारनें सर्व कर्जफेडीची मूळ जबाबदारी पत्करली आहे व पाकिस्तान आपला हिस्सा हिंदी सरकारास ५० वार्षिक हप्त्यांत देऊन टाकील. पहिलीं ५ वर्षे हप्ता नाहीं. फाळणीपूर्वी रोख्यांवरील व्याजाचा जो दर होता, त्याच दरानें पाकिस्तान व्याज भरील. पाकिस्तानसाठी स्वतंत्र नाणीं व नोटा पुरविण्यासाठी नाशिकच्या सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसचा व कलकत्ता आणि मुंबई येथील टाकसाळींचा उपयोग करून दिला जाईल. १ ऑक्टोबर १९४८ पर्यंत रिझर्व्ह बँकच दोन्हीं देशांची चलनविषयक मध्यवर्ती सत्ताधारी संस्था राहील. त्यानंतर पाकिस्तानची स्वतंत्र व्यवस्था सुरू होईल. प्रस्तुत आर्थिक करार यशस्वी करण्यांत हिंदुस्थान सरकारनें दाखविलेल्या तडजोडीच्या वृत्तीचें पाकिस्तान चीज करील, अशी आशा सरदार पटेल ह्यांनीं व्यक्त केली आहे.

### जी. श्री. दांडेकर मशिन वर्क्स लि., भिवंडी

वरील कंपनीनें ३० जून, १९४७ अखेर संपलेल्या वर्षी ६१½ लक्ष रुपयांची विक्री करून २ लक्ष, ३ हजार रु. ठोक नफा व ९७ हजार रु. निवळ नफा मिळविला. घसाऱ्यासाठी १७½ हजार रु. व नोकरांस आणि कामगारांस बोनससाठी २० हजार रु. बाजूस काढून ही निवळ नफ्याची रकम आहे. प्रेफरन्स भागांस ५% व ऑर्डिनरी भागांस ६%+२% बोनस = ८% नफा वाटण्यासाठी २५½ हजार रुपये लागले इन्कमटॅक्स, सुपर टॅक्स, इत्यादीसाठी ६१ हजार रुपयांची तरतूद करून जनरल रिझर्व्हकडे १० हजार रुपये वर्ग केले. कंपनीचें वसूल भांडवल ४,९९,३७५ रु. आहे. कंपनीनें ५ लक्ष रुपये दर्शनी किंमतीचे सरकारी रोखे घेतलेले असून त्यांच्या तारणावर ओव्हर ड्राफ्टची व्यवस्था केलेली आहे; मुदतीच्या ठेवींची रकम फक्त ७८ हजार रुपये आहे. ह्या कारणानें कंपनीस जरूरीपुरताच पैसा वापरण्यास घेता येऊन व्याजाचा दरहि बेताचा पडतो. अहवालाचे वर्षी कंपनीस तिनें गुंतविलेल्या रकमेवर १०½ हजार रु. व्याज मिळालें आहे. ताळेबंदाचे तारखेस बँकांकडील रोख्यांच्या तारणावरील कर्जाची रकम ५७ हजार रुपये होती.

कंपनीची वार्षिक सभा भिवंडी येथें नुकतीच झाली. त्यावेळीं कंपनीचे स्थापनेपासूनचे चेअरमन, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांनीं कंपनीच्या आठ वर्षांच्या प्रगतीचा आढावा घेऊन बोर्डानें कंपनीच्या भांडवलांत ५ लक्ष रुपयांची वाढ करण्याचें ठरविलें असल्याचें जाहीर केलें. म्हणजे, तें भांडवल आतां १० लक्ष रु. होईल. त्यासाठी प्रत्येकी १०० रु. चे ५,००० शेअर्स विक्रीस काढण्यांत येतील. सध्याच्या भागीदारांना ते प्रथम विकले जातील. त्यांची व कंपनीच्या नोकरांची आणि कामगारांची मागणी पुरी झाल्यावरच, शेअर्स बाकीच्यांना मिळूं शकतील. कारखान्याचे मूळ संस्थापक श्री. गोपाळ गणेश दांडेकर ह्यांच्या नेतृत्वाखाली मेसर्स दांडेकर इंजिनियर्स लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे. कंपनीनें ४% पासून ८% पर्यंत डिव्हिडंड आणलें व आठ वर्षांतील डिव्हिडंडची सरासरी ७% पडली ह्यावरून आणि वार्षिक अहवालावरून कंपनीची आर्थिक सुस्थिति लक्षांत येईल.

---

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें
### (वार्षिक सभा: ३१-१२-१९४७)

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर, १९४७ अखेरच्या वर्षी २२½ लक्ष रुपयांची साखर विकली. ऊस गाळणीसाठी ११½ लक्ष रुपयांचा ऊस लागला व ५½ लक्ष रुपये साखर करण्यासाठी खर्च आला. ३ लक्ष रुपयांची एक्साइज ड्यूटी द्यावी लागली. व्याज ४ लक्ष, १८ हजार रु. झालें. वर्ष अखेर नफा १,१०,३६० रु. उरला. त्यांतून घसारा काढल्यावर ३६,९३५ रु. रहातात त्यांत मागलि शिलकी नफा मिळवला म्हणजे नफा वाटणीस १,५३,४९६ रु. येतात. प्रेफरन्स भागांस ५% व ऑर्डिनरी भागांस १०% डिव्हिडंड दिल्यावर ५६,७४१ रु. नफा उरतो. १९४५-४६ च्या नफ्यावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या कित्येक गोष्टी १९४६-४७ मध्येंहि चालू राहिल्या. निरा राइट बँक कॅनॉल मध्यंतरी फुटल्यामुळें भर उन्हाळ्यांत २५ दिवस उसास पाणी मिळूं शकलें नाहीं, ह्या अडचणीची त्यांतच भर पडली. गूळ करण्यास सिंडिकेटला सरकारनें परवानगी नाकारल्यामुळेंहि अडचण भासली. नवीन यंत्रसामुग्री मुंबईची वाट चालत आहे, असें मशिनरीच्या कारखानदारांनीं कळविलें आहे. डिस्टिलरीची प्रगती, जरूर ते भाग न आल्यामुळें, मंदावली. ३० सप्टेंबर १९४७ रोजीं २,०७७ एकरांत ऊस आहे.

## मुंबई सरकारचें अन्नधान्यविषयक धोरण

फुडग्रेन्स पॉलिसी कमिटीच्या शिफारसींना व प्रांतांच्या मुख्य प्रधानांच्या परिषदेंत झालेल्या विचारविनिमयास अनुसरून मध्यवर्ती हिंदी संघानें अन्नधान्याच्या शिधापद्धतीच्या बद्दलचें आपलें धोरण बदलल्यावर मुंबई सरकारनेंही आपल्या प्रांतांत मध्यवर्ती सरकारच्या धोरणास पोषक असें धोरण अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. ह्या धोरणाची सामान्य रूपरेखा पुढीलप्रमाणें आहे :–(१) बृहत् मुंबई, अहमदाबाद, पुणें व सोलापूर शहरांतच फक्त शिधापद्धति चालू ठेवण्यांत येईल. (२) १ जानेवारी, १९४८ पासून प्रांतांत इतरत्र शिधापद्धति रद्द करण्यांत येईल. (३) १६ डिसेंबर १९४७ पासून प्रांतांतील अन्नधान्याची सक्तीची सरकारी वसुली व मक्तेदारी बंद करण्यांत येईल. (४) शेतकऱ्यांनीं खुषीनें दिलेलें अन्नधान्य ठराविक दरानें विकत घेण्याची हमी चालू ठेवली जाईल. ही पद्धत ३१ डिसेंबर, १९४८ पर्यंत चालू राहील. धान्याचे सध्याचे जे दर आहेत त्यापेक्षा गहूं, तांदूळ, ज्वारी आणि बाजरी ह्या धान्यांना मणामागें २ रुपये अधिक देण्यांत येतील. भाताला दर मणामागें १ रु. ६ आणे अधिक देण्यांत येतील. ह्या धान्याचा उपयोग प्रांतांतील शिधापद्धति बंद झालेल्या भागांत योग्य किमतीनें धान्य विकणारीं दुकानें काढण्यासाठी मुख्यतः करण्यांत येईल. (६) कांहीं अपवाद सोडून अन्नधान्याच्या वहातुकीवरील नियंत्रणें रद्द करण्यांत येतील. (७) प्रांताच्या बाहेर अन्नधान्यें व डाळी निर्यात करण्यावरील बंधनें चालू ठेवण्यांत येतील. (८) ज्या शहरांतून शिधापद्धति चालू रहाणार आहे तेथील नागरिकांना शिधाकार्डें रद्द करून चार आठवड्याच्या रेशन इतकें अन्नधान्य बाहेरून आणण्याची परवानगी मिळेल. मुंबई सरकारनें आखलेलें हें धोरण मध्यवर्ती सरकारच्या धोरणाशी सुसंगत असेंच आहे. सक्तीनें वसूल केल्या जाणाऱ्या धान्याच्या किंमती वाढवून द्या अशी मागणी शेतकऱ्यांतर्फे केली जात होती. तिचा विचार करून अशी धान्यवसुली रद्द झाली असली तरी खुषीनें धान्य देणाऱ्या शेतकऱ्याला धान्याचे भाव वाढवून मिळालेले आहेत.

---

## दत्तक घेण्याचा हेतु विचारांत घेण्याचें कारण नाहीं.

मुंबई हायकोर्टानें हिंदु अविभक्त कुटुंबाच्या समाईक मालमत्तेंत दत्तकाचा हक्क काय, ह्यासंबंधीं एक महत्त्वाचा निर्णय नुकताच दिला. निर्णयाची पूर्वपीठिका थोडक्यांत अशी :–सुंदरराव जयकर ह्या नांवाच्या पाठारे प्रभू गृहस्थांना बाळाजी व पांडुरंग असे दोन मुलगे होते. बाळाजीच्या पश्चात् त्यांची विधवा बायको सोनाबाई एकटीच राहिली. पांडुरंगपंत निवर्तल्यानंतर त्यांच्यामागे त्यांची बायको व एक मुलगा एवढीं राहिलीं. ह्या जयकर कुटुंबाची दादरला कांहीं स्थावर मालमत्ता होती. मार्च १९४६ मध्यें ही मालमत्ता विकण्याचें ठरलें. त्यानंतर सोनाबाईनें ता. २५ जुलै १९४६ रोजीं ह्या दाव्यांतील वादीला दत्तक घेतलें, व दुसऱ्या दिवशीं प्रतिवादी नं. १ ह्याला दत्तविधान झाल्याचें कळविलें. प्रतिवादीनें दत्तविधान मानलें नाहीं म्हणून वादीनें दावा आणला. प्रतिवादीतर्फे असें सांगण्यांत आलें कीं, सोनाबाईनें धार्मिक कारणासाठीं दत्तक घेतलेला नसून मालमत्तेसाठीं घेतला. कोर्टानें असा निर्णय दिला कीं दत्तविधानाबद्दलच्या हेतूचा विचार करण्याचें कारण नाहीं. ज्या कुटुंबासंबंधीं हा दावा चालला होता त्या कुटुंबाच्या जातींत 'दत्त होम' झाला म्हणजे दत्तविधान पुरें होतें. अर्थातच वादीला मालमत्तेपैकीं अर्धा भाग मिळणें न्याय्य आहे.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

**हेड ऑफिसः—पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

**मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

–: शाखा :–

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## अन्नधान्याच्या नियंत्रणाबाबत नवें धोरण

( लेखकः—ग. रा. जो. )

मध्यवर्ती हिंदी संघाचे अन्नमंत्री बाबू राजेंद्र प्रसाद ह्यांनीं अन्नधान्यावरील नियंत्रणें हळू हळू रद्द करण्याचा सरकारचा विचार असल्याचें गेल्या आठवड्यांत जाहीर केलें. स्वतंत्र हिंदी संघराज्यापुढें तांतडीचे नसले तरी वादग्रस्त अशा स्वरूपाचे जे प्रश्न उभे आहेत, त्यांत अन्नधान्यावरील नियंत्रणें दूर करावीं कीं अधिक कडक करावीं हा एक महत्त्वाचा प्रश्न होता व आहे. ह्या प्रश्नाकडे केवळ पुस्तकी अर्थशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें तर तो सोडविण्यास अगदीं सोपा असा वाटतो. प्रत्यक्ष व्यवहाराच्या दृष्टीनें तो तितकासा सोपा नाहीं, असें थोडासा विचार केला तर सहजच कळण्यासारखें आहे. अन्नधान्यावरील नियंत्रणें रद्द केलीं तर जिनसांचे भाव भरमसाठ वाढून ज्या हेतूनें युद्धकालीं अन्नधान्याची सक्तीची वसुली आणि शिधापद्धति सुरू झाली तो हेतूच असाध्य होईल असें नियंत्रणवाद्यांचें म्हणणें आहे. उलट, नियंत्रणें व शिधापद्धति चालू ठेवणें सरकारला दिवसानुदिवस कठीण होत चाललें असल्यानें खाजगी व्यापाराच्या मार्गानेंच अन्नधान्याचें वाटप हळू हळू करावें म्हणजे सरकारच्या अंगावरील जबाबदारी कमी होईल आणि थोड्या-बहुत काळानें पदार्थांच्या किंमतीहि खालीं येतील असें सरकारचें म्हणणें आहे.

ह्यासंबंधीं बाबू राजेंद्र प्रसाद ह्यांनीं केलेलें निवेदन वस्तुस्थितिनिदर्शक आणि म्हणूनच मार्गदर्शक आहे. शिधापद्धतीचें क्षेत्र ज्या प्रमाणांत वाढत गेलें त्या प्रमाणांत सरकारला अन्नधान्य मात्र मिळूं शकलें नाहीं. देशांतील सक्तीची धान्यवसुली आणि बाहेरची आयात हीं सामान्यपणें एकाच पातळीवर राहिलीं. उलट, शिधावाटपाच्या क्षेत्रांत मोडणारी लोकसंख्या मात्र सहापटीपेक्षां अधिक वाढली. अशा परिस्थितींत शिधावाटप पद्धति केव्हांतरी आणि एकाएकीं कोसळून पडण्याचा संभव आहे, हें कोणालाहि पटण्यासारखें आहे. सक्तीची धान्यवसुली पूर्णपणें यशस्वी झाली असती तरी सुद्धां घटत चाललेल्या अन्नधान्याच्या उत्पादनाचा प्रश्न सुटला नसता; इतकेंच नव्हे, तर उत्पादनांत होत असलेल्या घटीमुळें त्याचें स्वरूप अधिक अधिक बिकटच होत चाललें असतें. १९४३–१९४७ सालांतील अन्न धान्याच्या उत्पादनाचा पुढील तक्ता ह्या दृष्टीनें उद्बोधक आहे.

### हिंदुस्थानांतील अन्नधान्याचें उत्पादन

( आकडे हजार टनांचे )

| अखेरच्या पांच वर्षांची सरासरी | तांदूळ | गहूं | ज्वारी आणि बाजरी | ४ धान्यांची बेरीज | सरासरी पेक्षा + – |
|---|---|---|---|---|---|
| १९४३–४४ | २८,२०० | १०,६०० | ११,२०० | ५०,००० | — |
| १९४४–४५ | ३०,१०० | १०,८०० | १०,९०० | ५१,८०० | + १८०० |
| १९४५–४६ | २८,४०० | ९,२०० | ८,८०० | ४६,४०० | – ३,६०० |
| १९४६–४७ | ३०,२०० | ८,१०० | ८,५००, | ४६,८०० | – ३.२०० |

उत्तरोत्तर घटत चाललेल्या ह्या उत्पादनामुळें युद्धकालापेक्षांही युद्धानंतर अन्नधान्याच्या वसुलीचा व वाटपाचा प्रश्न अवघड झाला. उत्पादन कमी होण्यास पावसाचा अनियमितपणा, अपुरेपणा इत्यादि अनेक नैसर्गिक कारणें जबाबदार आहेत. एकदा अन्नधान्याची टंचाई पडूं लागल्याबरोबर त्याचे परिणाम वाटपाच्या कारभारांत दिसूं लागावे ह्यांत आश्चर्य नाहीं. बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें, शिधापद्धतीमुळें शिधाधिकाऱ्यांत व नोकरवर्गांत लांचलुचपत सुरू झाली, काळा बाजार सुरू झाला, खोटीं रेशनकार्डें घेतलीं जाऊं लागलीं आणि ह्या परिस्थितीचा बंदोबस्त करण्यासाठीं आणखी पुनः निराळाच नोकरवर्ग नेमावा लागला.

ह्या ठिकाणीं एक महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. तो असा कीं, नियंत्रणें व शिधापद्धति अमलांत आणणारा नोकरवर्ग कार्यक्षम ठरला नाहीं, म्हणून ती पद्धतच सावकाशीनें कां होईना, पण रद्द करणें कितपत न्याय्य आणि परिणामाच्या दृष्टीनें योग्य होईल? ह्या आक्षेपाचें उत्तर, अंशतः तरी, सध्याच्या म्हणजेच ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं निर्माण केलेल्या नोकरशाहीचें स्वरूप नीट समजून घेतलें तरच देता येईल. ब्रिटिश राजवटींत निर्माण झालेली नोकरशाही, ती राजवट चिरस्थायी करण्याच्या दृष्टीनेंच निर्माण केली गेली हें आतां कोणीही नाकबूल करीत नाहीं. मध्यवर्ती सरकारचा कारभार १५ ऑगस्ट १९४७ रोजीं प्रातिनिधिक हिंदी सरकारकडे आला, त्यावेळीं ह्या नव्या सरकारनें कांहीं नवी नोकरशाही निर्माण केली नाहीं. अन्नधान्याच्या उत्पादनाची परिस्थिति आणि शिधापद्धति अमलांत आणणारी नोकरशाही ह्यांचा विचार करतां मध्यवर्ती हिंदी सरकारनें घेतलेला निर्णयच योग्य आहे असें म्हणावें लागतें.

खाजगी व्यापाराच्या अंगभूत असणाऱ्या स्पर्धेला वाव दिला तर अन्नधान्याच्या किंमती योग्य त्या पातळीवर येतील अशी सरकारची अपेक्षा आहे. ती कितपत फलद्रूप होते तें आजच सांगता येण्यासारखें नाहीं. तथापि, ती फलद्रूप न होण्याची शक्यता सरकारनें नजरे आड केलेली नाहीं हेंही सुजाण नागरिकांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. सरकारनें अन्नधान्यावरील नियंत्रणें रद्द करण्याचा जो प्रयोग आरंभला आहे, तो अयशस्वी झाल्यास पूर्वीपेक्षांही अधिक कडक नियंत्रणें सरकारला बसवावीं लागतील असा सूचक इषारा बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं दिलेलाच आहे. पण एवढी सूचना दिल्यानें कार्यभाग संपला असें मात्र होत नाहीं. तशीच वेळ आली, तर निष्ठावंत सार्वजनिक कार्यकर्त्यांची संघटना तयार करून त्यांच्या ताब्यांत अन्नधान्याची वसुली व शिधापद्धत देण्यासाठीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं आतांपासून तयारीला लागलें पाहिजे. एकामागून एक नियंत्रणें रद्द केल्यावर खाजगी व्यापारामुळें वाटप योग्य किंमतीच्या पातळीवर आलें तर उत्तमच; पण दुर्दैवानें तसें झालें नाहीं तर परिस्थिति काबूंत ठेवण्याची दक्षता सरकारनें घेतली पाहिजे. ह्या कामीं सार्वजनिक कार्यकर्ते आणि ग्राहकांच्या सहकारी संस्था ह्यांचा उपयोग करून घेता येईल. पण, त्यासंबंधींची योजना मात्र अगाऊ तयार पाहिजे. उत्पादित अन्नधान्याच्या वाटणीचा अवघड झालेला प्रश्न खाजगी व्यापाराला वाव दिल्यामुळें सुटला, तरी त्याच्या उत्पादनांत झालेली घट कशी भरून काढावी हा प्रश्न शिल्लकच रहातो. अन्नधान्यांच्या किंमती चढ्या राहिल्या तर शेतकरी वर्गाला अधिक धान्य पिकविण्याला प्रलोभन राहील. अर्थातच ह्या चढ्या किंमतीची सर्वच्या सर्व मलई दलालांना न मिळण्याची काळजी मात्र सरकारच्या साह्यानें व स्वतःच्या प्रयत्नांनीं शेतकऱ्यांनीं घेतली पाहिजे. शेतीच्या धंद्याचें विस्कळित स्वरूप व त्यावर नियंत्रणें ठेवण्यांतील अडचणी ह्यांचा विचार करता शेतीच्या मालाच्या किंमती चढ्या ठेवून उत्पादन वाढविणें येवढाच मार्ग दिसतो. ह्या मार्गामुळें शहरांतील जनतेला महागाईला तोंड द्यावें लागेल हें खरें; पण, त्याला तूर्त इलाज नाहीं असें म्हणावें लागतें.

# कुळकायद्याची संक्षिप्त माहिती

लेखक:—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, सातारा

शेतकीसंबंधीं सुधारणा करण्याविषयीच्या सरकारच्या जाहीर धोरणास अनुसरून कुळांच्या कायदेशीर हक्काचें रक्षण करण्याकरितां मुंबई सरकारनें १९३९ सालींच कुळ कायदा केला होता. तो १९३९ चा २९ वा कायदा होय. तो प्रांतांतील कांहीं मोठ्या विशिष्ट भागालाच लागू केला होता. पुढें त्यांत वेळोवेळीं सुधारणा करून १९४६ सालीं १९४६ च्या २६ व्या कायद्यानें बऱ्याच महत्त्वाचे फरक १९३९ च्या कायद्यांत केले. हा १९४६ चा कायदा मुंबई शहर सोडून मुंबई प्रांतांतील सर्व भागांना ८ नोव्हेंबर १९४६ पासून लागूं केला आहे. ह्या कायद्यानें कुळाच्या जमिनींतील वहिवाटीस कायमपणा येतो. कुळाकडून जबर खंड घेतां येत नाहीं व अशा रीतीनें जमिनीची सुधारणा करून अधिक व चांगलें पीक काढण्यास कुळास उत्तेजन मिळतें.

एखादी जमीन कसणारा इसम हा त्या जमिनीचा संरक्षित कूळ नाहीं, हें शाबित करण्याचा बोजा ह्या कायद्यानें जमीनदारावर टाकला आहे. ह्या कायद्यानें जमीनदारास वाजवी खंड मिळूं शकतो; तसेंच स्वत: शेती करण्यासाठीं त्यास जमीन पाहिजे असेल तेव्हां संरक्षित कुळाची वहिवाट संपविण्याचा त्याला हक्क आहे.

कुळाच्या ताब्यांत असलेल्या जमिनींच्या बांध व रोळया कायम राखून त्या दुरुस्त ठेवण्याची जबाबदारी जमीनदारावर ठेविली नाहीं. हा कायदा कुरणांना, बागाइत जमिनींना व सर्व शेती जमिनींना लागू केला आहे. फक्त लाकडे तोडण्यासाठीं वापरण्यांत येणाऱ्या जमिनींना तो लागूं नाहीं.

## "संरक्षित कूळ"

ह्या कायद्यानें सर्व कुळांनाच कांहीं महत्त्वाचे फायदे मिळूं शकतात. "संरक्षित कूळ" हा एक कुळाचा नवीन वर्ग ह्या कायद्यानें निर्माण केला आहे. ह्या संरक्षित कुळांना कायम कुळवहिवाटीचा हक्क मिळतोच पण त्याखेरीज कांहीं महत्त्वाचे फायदेही मिळतात.

कोणत्याही जमिनींत सन १९३८ च्या जानेवारी महिन्याच्या १ ल्या तारखेच्या अथवा सन १९४५ च्या जानेवारी महिन्याच्या १ ल्या तारखेच्या लगत पूर्वी किमान सहावर्षें मुदतीपर्यंत जर एखाद्या कुळानें ती जमीन सतत धारण केली असेल व त्यानें त्या मुदतींत ती स्वत: कसली असेल तर त्यास संरक्षित कूळ म्हणून समजण्यांत येईल. तारीख ८ नोव्हेंबर १९४६ पासून एक वर्ष संपल्यानंतर प्रत्येक कूळ संरक्षित कूळ म्हणून समजण्यांत येईल व तसें हक्कांच्या पत्रकांत नमूद करण्यांत येईल. मात्र जमीनदार तारीख ७ नोव्हेंबर १९४७ रोजीं अगर त्या पूर्वी विविक्षित कूळ हें संरक्षित कूळ नाहीं असें जाहीर करण्याबद्दल मामलेदारकडे अर्ज करील. मामलेदारानें तसें जाहीर करण्याचें नाकारल्यास किंवा या निकालावर केलेल्या अपीलांत कलेक्टरानें तो निकाल रद्द केला नसेल तर तें कूळ संरक्षित कूळ म्हणून त्या जमिनीवर राहील.

जर कुळानें (१) कोणत्याही वर्षी जमीन महसुलाचा शेवटचा हप्ता भरण्यासाठीं ठरविलेल्या तारखेपासून १५ दिवसांचे आंत त्या वर्षाचा खंड दिला नसेल, (२) जर तो जमिनीस कायमचें नुकसानकारक असें कोणतेंही कृत्य करील, (३) जर कुळानें आपल्या ताब्यांतील जमीन पोट पट्ट्यानें दिली असेल किंवा तो जातीनें ती जमीन करणार नसेल, (४) जर त्यानें शेतकी खेरीज इतर कारणाकरितां ती जमीन वापरली असेल किंवा (५) त्यानें धारण केलेली जमीन पोट विभागली असेल, तर त्या कुळाचा कूळपणाचा हक्क नष्ट करण्यांत येईल. (अपूर्ण)

(ता. २३ ऑगस्ट १९४७ रोजीं मुंबई येथें ऑल इंडिया रेडिओवर झालेले भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांच्या परवानगीनें येथें दिलें आहे.)


## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि.

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २

### नोटीस.

ता. ७ फेब्रुवारी १९४८ नंतर सिंडिकेटच्या भागीदाराना त्यांचीं डिव्हिडंड वॉरंटस रवाना करण्यांत येतील. तरी ज्या भागीदारांचे पत्ते बदलले असतील त्यांनीं आपले बदललेले पत्ते सिंडिकेटचे ऑफिसांत कळविण्याबद्दल विनंति आहे. तसेंच भागिदारांनीं अॅलॉटमेंट लेटर्स परत करून आपलीं शेअर सर्टिफिकिटें नेण्याची तजवीज करावी अशी विनंति आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.
मॅनेजिंग एजंटस.

## शेतकरी कर्जनिवारण कायदा

मूळ इंग्रजी टेक्स्ट, कानू, फॉर्मसह. पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं लिहिलेलें. साधी बांधणी, किं. ४ रु., कापडी बांधणी ४॥ रु. याशिवाय द्विभार्या प्रतिबंधक कायदा, किं. १ रु., हिंदु घटस्फोट कायदा, किं. १ रु., हीं पुस्तकें तयार आहेत. कुळकायदा दुसरी आवृत्ती संपली. तिसऱ्या आवृत्तीसाठीं नांवें नोंदा.

पत्ता : लॉ अॅकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें.

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ३,९०,००० |

चेअरमन—श्री. धों. कृ. साठे

बँकेच्या शाखा:—डेक्कन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट, गिरगांव व दादर), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर (पे ऑफिस), नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कल्याण.

★सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची व्यवस्था केली आहे.
★चालू खात्यांवर द. सा. द. शें. ½ टक्का व्याज दिलें जातें. मात्र दर सहा महिन्यास कमींत कमी व्याज पांच रुपये झालें पाहिजे.
★सेव्हिंग्ज खात्यांत द. सा. द. शें. १॥ टक्क्यांप्रमाणें व्याज दिलें जातें.
★मुदती ठेवीची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते. व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचें काम केलें जातें.

चिं. वि. जोग,
मॅनेजर




दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*( कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागीदारांची मर्यादित जबाबदारी असलेली.)*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ४०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | २०,२६,००० |
| भरलेलें (३०-६-४७) | रु. | ३,०५,४७० |
| रिझर्व्ह (३०-६-४७) | रु. | ५,८६,६६० |

एकूण खेळतें भांडवल रु. १,००,००,००० हून अधिक

मुख्य कचेरी--बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी-कोल्हापूर.

शाखा : संस्थानांतील:—(१) शाहुपुरी-कोल्हापूर, (२) गुजरी-कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ-वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. संस्थानाबाहेरील:—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.


★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

★ मौल्यवान चीजवस्तु सुरक्षित ठेवणेसाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. ए. सावंत, अॅ. मॅनेजर

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए.-यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें